दिलेल्या वचनांपैकी एकाचीही पूर्तता करण्यात नव-उदारमतवादी धोरणांना यश आलेले नाही. उलट, त्यांच्यामुळे, भारताला वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या सामाजिक विषमता, बेरोजगारी, जातीय आणि धार्मिक तेढ यांसारख्या काही समस्या जास्त तीव्र झाल्या आहेत. तरीही, रामबाण उपाय म्हणून सत्ताधारी वर्ग त्यांनाच उचलून धरतोय. नव-उदारमतवादी धोरणाचे महत्त्वाचे निमित्य वापरून काही सेवांचे खाजगीकरण केले, या सेवा आत्तापर्यंत सरकार पुरवत असे. पण आता सरकार स्वतःच्या बळाचा वापर, त्यांच्याविरुद्ध करत आहे, ज्यांना या बदलाची झळ लागतेय. बहुतांशी सार्वजनिक सेवा आणि पायाभूत सुविधा आता खाजगी क्षेत्रांच्या ताब्यात गेल्या आहेत आणि सरकारने आपले लक्ष, कोणत्याही समाजाच्या सामाजिक परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या शिक्षणाकडे वळवले आहे. उच्च शिक्षणामध्ये ह्या प्रक्रियेची सुरुवात झालेली आहे आणि आता सत्ताधारी वर्गाने शालेय शिक्षणामध्ये उलथापालथ, विध्वंस करायला सुरुवात केली आहे, विशेषकरून पीडित जनतेच्या. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर ते बृहन्मुंबई महानगरपालिकेने ह्या वर्षाच्या सुरुवातीला, त्यांच्या अखत्यारीतील शाळा खाजगी संस्थांना देण्याच्या निर्णयाचे देता येईल. बराच गवगवा झालेल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या योजनेच्या (PPP) चौकटीतला हा निर्णय होता.

# शिक्षणाला तरी

— आनंद तेलतुंबडे

(हा लेख "इकॉनोमीक ॲण्ड पॉलिटीकल वीकली" ०८-०६-२०१३, मासिकातील अंकामधुन लेखकाच्या परवानगीने पुर्नमुद्रीत व अनुवादीत केला आहे.)



# वेगळे ठेवा !

# म.न.पा. शाळांचा लिलाव

भारतातली सर्वात श्रीमंत महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंदाजे ११७४ शाळांमध्ये दाखल झालेल्या सुमारे चार लाख मुलांना मोफत शिक्षण देते, ११ हजार ५०० शिक्षक आठ माध्यमांतून शिक्षणाचा प्रसार करतात. या व्यतिरिक्त, मुंबई महानगरपालिका मंदबुद्धीच्या मुलांसाठी १८ शाळा आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या ५५ 'मुंबई सार्वजनिक शाळाही' चालवते.

मुंबई महानगरपालिका तिच्या उत्पन्नाच्या ८ ते ९ टक्के हिस्सा शिक्षणावर खर्च करते, ह्या वर्षाचा तिचा नियोजित खर्च २,३४२ कोटी आहे, आणि तो मागील वर्षापेक्षा ६५ टक्क्यांनी जास्त आहे. शाळांमधून प्रत्येक विद्यार्थ्यांवर होणारा ३६,७५० रु. खर्च देशात सर्वात जास्त गणला जातो. पण, वर्षागणिक मुंबई महानगरपालिकेच्या शाळांत उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मात्र घटत चालली आहे. २००७-८ मध्ये ४,२०,४४० असलेली संख्या, २०११-१२ मध्ये कमी होऊन ३,८५,६५७ इतकी झाली. अतिशय गरीब पालक त्यांच्या मुलांना म.न.पा. च्या शाळांमध्ये पाठवतात. पण, चतुर्थ श्रेणीचे म्हटले जाणारे कामगार, उदाहरणार्थ, म.न.पा.च्या शाळांमधले सफाई कामगार आणि मदतनीस मात्र त्यांच्या मुलांना ह्या शाळांमध्ये पाठवत नाहीत. मुंबई, जिला भारताची आर्थिक राजधानी म्हटले जाते, पूर्ण देशात जमा करण्यात येणाऱ्या करापैकी ३३ टक्क्यांहून जास्त कर जिथून दिला जातो आणि संपूर्ण देशात सर्वात जास्त दरडोई उत्पन्न जिथे आहे, रू. ६५,३६१/-, जे देशाच्या रू.२९,३८२/- ह्या सरासरी उत्पन्नाच्या दुपटीहून अधिक आहे, दररोज २० रूपयांहून कमी पैसे मिळविणाऱ्या लोकांची संख्या येथे चाळीस लाखांहून अधिक आहे. हेच लोक, जे मुख्यत्वे, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, मुस्लीम आणि ख्रिश्चन समाजाचे असतात आणि ते त्यांच्या मुलांना म.न.पा. शाळांमध्ये पाठवतात.

ह्या वर्षी २३ जानेवारी रोजी, बृहन्मंबई महानगरपालिकेने, ह्या मुलांच्या पालकांना न विचारता, हया शाळांचे प्रमुख भागधारक असलेल्या शिक्षकांना विश्वासात न घेता, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास विभागाने केलेल्या (डीएफआयडी) अभ्यासाचा आधार घेऊन, खाजगी-सार्वजनिक सहभागाच्या (PPP) सौम्य नावाखाली, तिच्या अखत्यारीतल्या शाळांचा खाजगी संस्थांकडे लिलाव केला. एखाद्या घटनात्मक संस्थेने आपल्या घटनात्मक बांधिलकीपासून फारकत घेऊन आपल्या शाळा खाजगी संस्थांच्या ताब्यात देण्याची देशातली ही पहिलीच घटना असेल. असे असले तरी, शिक्षण क्षेत्रात, धर्मादाय मंडळांमध्ये आणि खाजगी संस्थांमध्ये ''उत्कृष्ट दर्जाच्या कामाची'' नोंद असणाऱ्या संस्थांच्या साहाय्याने गरीब मुलांना उच्च दर्जाचं शिक्षण देण्याची संधी देण्याचा हेतू निश्चितच चांगला होता. हया शाळांचा लिलाव सुस्थितीत असलेल्या औद्योगिक संस्थांना करण्यात येईल, ज्या ''तांत्रिक किंवा शैक्षणिक क्षेत्रात'' 'शाळांचा दर्जा उंचावणे' मान्यताप्राप्त संस्थांबरोबर सामंजस्य करार करतील. ("SCHOOL ENHANCEMENT PROGRAMME") (जो युनिसेफ (UNICEF) आणि McKINSEY आणि कंपनी यांनी २००९ मध्ये सुरू केला आणि ज्यात आकांक्षा, असीमा आणि नंदी फाऊंडेशनसारख्या स्वयंसेवी संस्था (एन.जी.ओज्.) सामील आहेत. हे कार्यरत होण्यासाठी युनिसेफ आणि 'म.न.पा.' मध्ये झालेल्या सामंजस्य करारांतर्गत ही प्रक्रिया पार पडेल. म.न.पा. ने चांगल्या प्रतीचं शिक्षण देण्यात आलेल्या अपयशाचे कोणतेही कारण दिले नाही, आणि संशयास्पद पात्रता असलेल्या खाजगी भागीदारीबद्दलही काही स्पष्टीकरण दिले नाही, ज्यात सार्वजनिक निधीमधून खाजगी फायदा होताना दिसत होता. खाजगी-सार्वजनिक सहभागाची (PPP) संकल्पना तशी नवीन नाही पण

त्याचा खाजगीकरणाच्या घटकासाठी वापर करून घेणे आणि तेसुद्धा कोणत्याही प्रकारचा सार्वजनिक विरोध होऊ न देता, हे खरे तर नव-उदारमतवाद्यांच्या कुशल बुद्धिमत्तेचे द्योतक म्हणावे लागेल. राज्य सरकारला आता फक्त पीडितांच्या विकासाची काळजी असल्याचा मुखवटा धारण करण्याची गरज आहे आणि त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने उत्पादनक्षमता गाठण्यात अपयश येत आहे, असा सूर आळवावा लागेल. पुरेशा निधीचा अभाव या व्यतिरिक्त खाजगी क्षेत्राची अंगभूत कार्यक्षमता हेही ही संकल्पना राबवण्यामागचे मुख्य कारण होऊ शकते. खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) जगभरातल्या सत्ताधाऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे कारण त्याद्वारे प्रचंड प्रमाणात सार्वजनिक निधी खाजगी क्षेत्रात हस्तांतरीत करता येतो आणि ते करताना होणाऱ्या करारांमधील त्रुटींमधून त्यांना बराच फायदा होतो. गेल्या काही वर्षांमधील बऱ्याचशा पायाभूत प्रकल्पांमध्ये खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) हे एक आयते निमित्त बनलेले आहे. खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) चा उल्लेख सर्वप्रथम भारतीय जनता पार्टीच्या / एन.डी.ए. च्या १९९९ सालातल्या निवडणूक जाहिरनाम्यात केला गेला. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकालात एन.डी.ए. सरकारने खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) पद्धत निरनिराळ्या क्षेत्रांत राबवण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. नंतर, ही संमिती नियोजन आयोगाकडे सोपवण्यात आली. काँग्रेसच्या नेतृत्त्वाखाली २००४ मध्ये यु.पी.ए. सरकार सत्तेत आले, तेव्हा ही समिती पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याकडे आपला अहवाल पाठवू लागली. सप्टेंबर २००७ मध्ये, मनमोहन सिंग यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियोजन आयोगाच्या एका बैठकीदरम्यान जाहीर केले की, शिक्षणाच्या सर्व स्तरावरील उपक्रम खाजगी-सार्वजनिक सहभागामार्फत (PPP) घेतले जातील. तेव्हापासून, अकराव्या आणि बाराव्या पंचवार्षिक योजनांमध्ये, शिक्षणव्यवस्थेमधील सार्वजनिक निधीवर ताबा मिळवण्यासाठी औद्योगिक समूह, एन.जी.ओज्. आणि धार्मिक संस्थांमध्ये चढाओढ सुरू झाली आहे.

राज्य सकरकारने खाजगी संस्थांबाबत दाखवलेल्या औदार्यामध्ये, जमिनी मोफत किंवा प्रचंड कमी दराने देणे, पायाभूत बांधणीसाठी अनुदान देणे, वीज, पाणी आणि बस सेवा स्वस्त दरात पुरविणे, आयकरामध्ये सूट देणे, अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांची फी भरणे, आउटसोर्सिंगच्या मोठ्या संधी उपलब्ध करून देणे, इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. पण, ज्यांना इतक्या प्रचंड प्रमाणात सार्वजनिक निधी उपलब्ध करून दिला आहे, त्या खाजगी संस्थांनी त्यांची कार्यकुशलता कशी वापरली आहे याचा मात्र पुरावा नाही. उदाहरणार्थ, म.न.पा. च्या ११,५०० शाळांची किंमतच हजारो कोटी रूपये असेल.

खाजगी शिक्षण, आपल्या देशात कित्येक वर्षांपासून उपलब्ध आहे पण उच्च दर्जाचे शिक्षण मात्र सार्वजनिक क्षेत्रात आहे, खाजगी संस्था जरी बऱ्याच प्रमाणात असल्या तरी त्यातल्या एकाचीही तुलना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आय.आय.टी.) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आय.आय.एम.), ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (ए.आय.आय.), जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी किंवा दिल्ली युनिव्हर्सिटीशी होऊ शकत नाही. नव-उदारमतवादाच्या गदारोळात, १९७० च्या सुरूवातीला उच्च प्रतीचे शिक्षण हे फक्त सरकारी संस्थांशी सलग्न होते, या वस्तुस्थितीकडे दुर्लक्षच केले गेले. राजकारणातील वाढत्या स्पर्धेच्या लाटेबरोबर शाळांच्या शैक्षणिक स्वातंत्र्यावर घाला घातला आणि त्या राजकारणी सत्ताधाऱ्यांच्या गुलामगिरीत पडल्या. म.न.पा.च्या ह्याच शाळा एके काळी उच्च प्रतीच्या शिक्षणासाठी प्रसिद्ध होत्या आणि त्यातून असंख्य नामांकित लोक नावारूपाला आले. नवी दिल्ली येथील नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ एज्युकेशनल प्लानिंग ॲन्ड

ॲडमिनिस्ट्रेशनच्या जे.बी.जी. टिळक यांनी, अकराव्या योजनेअंतर्गत खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) उपक्रमाद्वारे २५०० मॉडेल शाळा भरवण्याच्या योजनेचे विश्लेषण केल्यानंतर अचूक निष्कर्ष काढला होता की, खाजगी-सार्वजनिक सहभाग (PPP) हे खाजगीकरण नाही आणि यातून नफ्याच्या हेतूने उदात्तीकरण नसल्याचा दावा जरी करण्यात येत असला तरीही ही योजना याच्या विरूद्ध बाबीला प्रोत्साहन देणारी आहे, ती बाब म्हणजे–खाजगीकरण आणि मोठ्या प्रमाणावरचे व्यावसायिकीकरण, फक्त थोड्या वेगळ्या पद्धतीने, म्हणजेच सार्वजनिक निधीचा वापर करून केलेले असणार आहे. (द हिंदू, २४ मे २०१०)

# व्यापारीकरण नको

नव-उदारमतवादी विध्वंसक चक्राने एके काळच्या सार्वजनिक सेवांना केवळ व्यापारी मालांचे स्वरूप दिलेय. तिच्या नजरेतून शिक्षणसुद्धा एक बाजारू सेवा आहे, ज्यात तरूणाई म्हणजे भांडवलशाहीमधल्या रोजंदारी मजुरांसाठी लागणारा कच्चा माल आहे. पण, अध्यापनविद्या खूप पवित्र आहे, तिचा असा वापर होऊ शकत नाही. जगभरात, शिक्षण हे सामाजिक बदल घडवून आणणारे साधन मानले जाते. आपल्या पूर्वजांनी शिक्षणाकडे समतेचे द्योतक म्हणून पाहिले आणि आपल्या घटनेत मुलभूत हक्कांमध्ये त्याचा समावेश करण्याचा प्रयत्न केला. पण दुर्देवाने, ते तसे करू शकले नाहीत आणि शिक्षण हे राज्य सरकारच्या केवळ मार्गदर्शक तत्त्वांच्या कक्षेत मर्यादित राहिले. (राज्य सरकारवर त्याचे कायदेशीर बंधन नव्हते) तथापि, त्यांनी चौदा वर्षां पर्यंतच्या मुलांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी वयाची दहा वर्षांची मर्यादा घालून दिली. आपल्या सर्व सत्ताधाऱ्यानी मात्र याकडे दुर्लक्ष केले होते पण १९९३ च्या उन्नीकृष्णन खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाने ते हादरून गेले, ज्यात कलम २१ चा हवाला देऊन शिक्षण हा मुलभूत हक्काचाच भाग आहे असे घोषित करण्यात आले. पण, २००९ मध्ये संमत करण्यास आलेला तथाकथित शिक्षणाधिकार ही खरे तर फसवणूक आहे, त्यात ० ते ६ वर्षे वयोगटातल्या सर्वात कमजोर समजल्या जाणाऱ्या लहान मुलांना वगळून त्यांनी घटनेच्या मूळ हेतूलाच डावलले आहे आणि बहुस्तरीय शिक्षण व्यवस्थेला कायदेशीर मंजुरी दिली आहे, खरे म्हणजे, कुपोषित गरोदर महिलांची वाढती संख्या बघता शासनाने योग्य आरोग्यसेवा पुरवणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून, कोणतेही मूल व्यंग घेऊन जन्माला येणार नाही. पहिल्या शिक्षण आयोगाच्या (१९९६४-६६), कोठारी आयोगाच्या, निरीक्षणानुसार राष्ट्राच्या आकांक्षा पूर्ण करायच्या असतील तर लोकांचे ज्ञान, कौशल्य, आवडी आणि तत्त्वे यांत आमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. शैक्षणिक आणि अर्थिक उन्नतीशी निगडित अशा प्रत्येक योजनेचा मूळ गाभा हाच असायला हवा, ज्याची आज भारताला गरज आहे. त्यांनी एक सखोल निरीक्षण नोंदवले, ''जर असा बदल प्रचंड मोठ्या प्रमाणावर घडवून आणायचा असेल आणि तोही कोणत्याही हिंसक आंदोलनाशिवाय (आणि जरी तशी गरज भासली तरीही) तर एकच साधन आहे, आणि त्या एकाच साधनाचा वापर केला पाहिजे, ते आहे, "शिक्षण.'' त्यांनी घटनेच्या मूळ हेतूचा मान राखणारी, सर्व मुलांना जवळच्या शाळांमधून मोफत आणि अनिवार्य शिक्षण देण्याची कल्पना मांडली. आपल्या सत्ताधाऱ्यांनी जर इतक्या सोप्या गोष्टीचे पालन केले असते तर आज भारतातील बऱ्याच दुष्ट प्रवृत्तींना आळा बसला असता. माझे ठाम मत आहे की जर राज्य शासनाने, कोणतेही मूल कुपोषणामुळे आलेल्या व्यंगाशिवाय जन्माला यावे आणि प्रत्येक मुलाला समान शिक्षण दिले जावी याची खबरदारी घेतली असती, तर आरक्षणाची आणि घटनात्म जातींची गरजच भासली नसती. आज म.न.पा. आहे, उद्या पूर्ण देशाची पाळी असेल. आपण शिक्षणाच्या खाजगीकरणाला ठाम नकार द्यायला हवा.